लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा १९ जुलैपासून

## वेळापत्रक जाहीर; एमसीक्यू स्वरुप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील विविध पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ऑफलाइन एमसीक्यू (बहुपर्यायी प्रश्नावली) स्वरुपातील ५६१ परीक्षांचा प्रारंभ १९ जुलैपासून होणार आहे. या परीक्षांसाठी दोन लाख परीक्षार्थी असणार आहेत. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बुधवारी सायंकाळी या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले.

अभियांत्रिकी, विधि अभ्यासक्रमांप्रमाणे सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू पद्धतीने घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने निर्णय घ्यावा, अशी मागणी सर्व विद्यार्थी संघटना कृती समितीने केली होती. त्याची दखल घेऊन जून अखेरीस विद्यापीठाने विद्या परिषदेच्या मान्यतेनुसार सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेण्याचे जाहीर केले. त्यानंतर बुधवारी परीक्षांचे वेळापत्रक ऑनलाईन जाहीर केले. त्यातील पहिल्या टप्प्यात बीएस्सी. भाग दोन, तीन आणि बी. ए., बी. कॉम आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. १९ जुलैपासून सुरू होतील. विधी, अभियांत्रिकी, फार्मसी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांना दि. २५ जुलैपासून प्रारंभ होणार आहे.

### परीक्षेचे स्वरुप

सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण) परीक्षा एक तास कालावधीची एमसीक्यू पद्धतीने होणार आहे. ओएमआर शीटद्वारे परीक्षा घेण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्याचे काम आता सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

उन्हाळी सत्रात होणाऱ्या परीक्षा : ५६१

परीक्षार्थींची संख्या : २ लाख

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा १९ जुलैपासून

## सर्व अभ्यासक्रमांसाठी 'ऑफलाईन एमसीक्यू'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा १९ जुलैपासून सुरू होत आहेत. सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा 'ऑफलाईन एमसीक्यू' पद्धतीने होणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **पान ७ वर**

### परीक्षेचे स्वरूप असे

ऑफलाईन स्वरूपात ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा होणार आहे. प्रश्नपत्रिकेत प्रत्येकी २५ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नाला २ गुण देण्यात येतील. सर्व पेपर १ तास कालावधीचे असतील. पहिल्या सत्रात १० ते ११, दुसऱ्या सत्रात दुपारी १ ते २ आणि तिसऱ्या सत्रात सायंकाळी ४ ते ५ या वेळेत परीक्षा होईल.

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा १९ जुलैपासून

**(पान १ वरून)** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा 'ऑफलाईन एमसीक्यू' पद्धतीने घ्याव्यात, या मागणीसाठी विद्यार्थी संघटनांकडून आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनानंतर २५ जूनपासून सुरू होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला होता. यानुसार 'ऑफलाईन एमसीक्यू' पद्धतीने परीक्षा होणार आहेत. बुधवारी सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. त्याची माहिती सर्व महाविद्यालये, शैक्षणिक संस्थांना देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 JUL 2022 पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा १९ जुलैपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा १९ जुलैपासून सुरू होत आहेत. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने होणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. सविस्तर वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्यात याव्यात, अशी मागणी विद्यार्थी संघटनांकडून करण्यात आली होती. त्यासाठी संघटनांकडून ठिय्या आंदोलनही करण्यात आले. या आंदोलनानंतर २५ जूनपासून सुरू होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला होता. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला होता. बुधवारी विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. परीक्षाबाबतची माहिती सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था, तसेच विद्यापीठातील सर्व अधिविभागांना देण्यात आली आहे.

## अशी होणार परीक्षा

अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा ऑफलाईन स्वरूपात ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहे. प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी असणार आहेत. प्रत्येक प्रश्नास २ गुण देण्यात येतील. सर्व पेपर १ तास कालावधीचे असतील. पहिल्या सत्रामध्ये १० ते ११, दुसऱ्या सत्रामध्ये दुपारी १ ते २ आणि तिसऱ्या सत्रामध्ये सायंकाळी ४ ते ५ या वेळेत परीक्षा होणार आहे.

0 7 JUL 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारताकडे जागतिक उत्पादन केंद्र बनण्याची क्षमता

## डॉ. नारायणन : वेल्लोर येथे 'स्तुति' कार्यशाळेचे उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

'मेक इन इंडिया' उपक्रमाच्या साहाय्याने भारत अत्याधुनिक उत्पादनांचे केंद्र म्हणून वेगाने सामोरा येतो आहे. देशामध्ये २०३० पर्यंत वार्षिक ५०० अब्ज अमेरिकी डॉलर इतक्या उलाढालीचे जागतिक उत्पादन केंद्र बनण्याची क्षमता आहे, असे प्रतिपादन इस्त्रोच्या तिरुअनंतपुरम येथील विक्रम साराभाई स्पेस सेंटरचे मटेरियल मॅनेजमेंट संचालक डॉ. पी. रमेश नारायणन यांनी वेल्लोर (तामिळनाडू) येथे केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे प्रायोजित आणि शिवाजी विद्यापीठ आणि वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वेल्लोर यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुति (सिनर्जिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) योजनेंतर्गत सातदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. नारायणन म्हणाले, जागतिक बलाढ्य उद्योगांनी एक तर भारतात उत्पादन प्रकल्प स्थापन केले आहेत किंवा ते स्थापन करण्याच्या प्रक्रियेत आहेत. उद्घाटन समारंभात शिवाजी विद्यापीठाच्या सैफ विभागाचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी 'अत्याधुनिक उपकरणे वापरून संरचनात्मक वैशिष्ट्यीकरण' या विषयावर व्याख्यान दिले. तत्पूर्वी, अधिष्ठाता डॉ. देवेंद्रनाथ रामकुमार यांनी प्रास्ताविक केले. सेंटर फॉर इनोव्हेटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग अँड रिसर्चचे संचालक डॉ. ए. राजा अण्णामलाई यांनी कार्यशाळेचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. आर. वासुदेवन यांनी आभार मानले.

07 JUL 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या परीक्षा १९ जुलैपासून

## संचालक डॉ. अजितसिंह जाधव; दोन टप्प्यांत परीक्षा, बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नपत्रिका

**कोल्हापूर, ता. ६ :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना १९ जुलैपासून सुरुवात होणार आहे. पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षा यांचा विचार करून दोन टप्प्यांत परीक्षा होतील. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून परीक्षा होणार आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आज पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

विद्यापीठाच्या परीक्षा या वेळी वादाचा आणि चर्चेचा विषय ठरल्या. सुरुवातीला परीक्षांचे नियोजन झाले. मात्र, त्यानंतर विद्यार्थ्यांनी परीक्षा ऑफलाईन घ्या; पण प्रश्नपत्रिकेचे स्वरूप एम.सी.क्यू (बहुपर्यायी) असावे, अशी मागणी केली. यासाठी विविध विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठात आंदोलनही केले. आंदोलनाची दखल घेऊन विद्यापीठ प्रशासनाने सर्वच परीक्षा बहुपर्यायी स्वरूपाने घेण्याचे नियोजन केले. त्यामुळे परीक्षांच्या तारखा पुढे गेल्या. त्यानंतर आज परीक्षेचे नवे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा १९ जुलैपासून सुरू होणार आहेत. पहिल्या टप्प्यात कला, वाणिज्य व विज्ञान यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाच्या परीक्षा घेतल्या जातील. कारण, या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. काही प्रवेश परीक्षा झाल्या असून, त्यांच्या मुलाखती नजीकच्या काळात होणार आहेत. त्यांना याची तयारी करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा, यासाठी पहिल्या टप्प्यात या परीक्षा घेतल्या जातील. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात अभियांत्रिकी, फार्मसी, विधी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या परीक्षांना २५ जुलैपासून प्रारंभ होईल. परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालयांना पाठविले असून, महाविद्यालयांनी यात्रमाणे तयारी करायची आहे.



### ५० गुणांची परीक्षा

शिवाजी विद्यापीठाच्या सर्व परीक्षा या वर्षी बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेद्वारे घेतल्या जातील. यात बहुपर्यायी स्वरूपाचे २५ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्न दोन गुणांचा असेल. एकूण ५० गुणांची परीक्षा होणार आहे. परीक्षेचा कालावधी एक तासाचा असेल.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. अजितसिंह जाधव यांचा श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे सत्कार झाला. यावेळी एम. एल. चौगुले, प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, विजय हरगुडे, भास्कर सांगावकर.

# 'रवळनाथ'तर्फे डॉ. जाधव यांचा सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी प्रा. डॉ. अजितसिंह जाधव यांची निवड झाल्याबद्दल येथील श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे त्यांचा सत्कार झाला. संस्थेचे संस्थापक एम. एल. चौगुले यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी शिवाजी विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता पाटील, 'रवळनाथ'चे संचालक महेश मजती, कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष विजय हरगुडे, शाखा सल्लागार भास्कर सांगावकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 7 JUL 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परीक्षांच्या तारखा जाहीर

## १९ जुलैपासून मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षांना प्रारंभ

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्व परीक्षा ऑफलाईन वस्तुनिष्ठ पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षांना १९ जुलैपासून प्रारंभ होणार आहे. परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जाणार आहे. याबाबत सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केली आहे.

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी. बी.ए., बी.सी.ए., एल.एल.एम., एम. एस.डब्ल्यू., बी.व्होक., बी.जे., एम. लिप., बी.फार्मसी, एम.फार्मसी यासह अन्य परीक्षांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. एम.ए.च्या परीक्षांना ७ जुलैपासून प्रारंभ होणार आहे.



संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित ५० गुणांची परीक्षा होणार आहे. (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण), परीक्षेचा वेळ एक तासाचा असून वस्तनिष्ठ (एमसीक्यू) पद्धतीने घेण्यात येणार आहे. ही परीक्षा ओएमआर शीटवर घेतली जाणार आहे. सेमिस्टर एकच्या परीक्षा सकाळी १० ते ११ या वेळेत होतील. सेमिस्टर दोनच्या परीक्षा दुपारी १ ते २ या वेळेत होणार आहेत. सेमिस्टर तीनच्या परीक्षा दुपारी ४ ते ५ यावेळेत होणार आहेत.